## सन 2018-19

## मराठी वाङ्‍:मय मंडळ सन 2018-19 च्या आयोजित झालेल्या कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल

शंकर नारायण कला व वाणिज्य महाविदयालयात मराठी वाङ्‍:मय मंडळाच्यावतीने विदयार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. संपूर्ण वर्षभरात शैक्षणिक दृष्टया व सांस्कृतिक दृष्टया विविध उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठी अस्मितेचा वारसा जपत आणि विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी कार्यक्रमाची अमंलबजावणी केली जाते. विशेष म्हणजे विदयार्थी वर्ग ही मराठी भाषेचा अभिमान जपत सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होत असतात.

सन 2018-19 सदरच्या कालखंडात शंकर नारायण कला व वाणिज्य महाविदयालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांतर्गत कथाकथन स्पर्धा रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, भित्तीपत्रके स्पर्धा, घोषवाक्ये स्पर्धा अन्य विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धामध्ये विदयार्थ्यांनी सहभागी होऊन पारितोषिके पटकावली. तसेच कोरोना काळात आभासी पध्दतीने घेण्यात आलेल्या “काव्याच्या गावा जावे” या काव्यकुसुमाजली कार्यक्रम सादर करण्यात आला. तसेच मराठी राज्यभाषा दिन सादर करण्यात आलेल्या “काव्यकुसुमाजली” च्या कार्यक्रमात स्वरचित कविताचा सदाबहार कार्यक्रम सादर करण्यात आला.

अशा प्रकारे दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन विदयार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो.

**प्रा.रणजीता विरकर**
**मराठी विभाग**